ESTD 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

संदर्भ: वित्त मंत्रालय, भारत सरकार, दिल्ली यांचे परिपत्रक कमांक 04/2022F.No.275/192/2020-IT (B) दि. 15 मार्च, 2022.

शिवाजी विद्यापीठातील सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, आयकर नियम 1961 मधील कलम 192 प्रमाणे संपूर्ण वर्षामध्ये मिळणा-या वेतन व इतर भत्त्यांची रक्कम करमुक्त मर्यादेहून जास्त असेल तर वेतन आदा करण्या-या अधिका-यावर पगार आदा करताना कपात करण्याची जबाबदारी असते. यासंदर्भात आयकर कार्यालयास मासिक, त्रैमासिक व वार्षिक अहवालामध्ये प्रत्यक्षात आदा केलेले वेतन व त्या वेतनातून करमुक्त असलेल्या वजावटी यांची माहिती विहित प्रपत्राद्वारे दिली जाते.

विद्यापीठातील सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवक यांनी सन 2022-23 या आर्थिक वर्षामधील आपले अपेक्षित उत्पन्न व आयकर सवलत मिळणेसाठी गुंतवणूक करणेत आलेली / येणारी रक्कम या संदर्भातील तपशीलवार माहिती देवून अंदाजे करपात्र उत्पन्न व भरावा लागणारा आयकर/अधिभार याचे स्वनिर्धारण करून त्या बाबतची माहिती यापूर्वी विहित नमुन्यात नमुद करून पगारपत्रके विभागास सादर केली जात होती. **तथापी आता सदरची माहिती ऑनलाईन पद्धतीने Google Link द्वारे भरून देणेची असून त्याबाबतची माहिती खालील प्रमाणे:-**

1. सदरचा अर्ज **https://forms.gle/TjQNWP6Zrwbxduo86** या गुगल लिंक द्वारे भरण्यात यावेत.
2. अर्ज भरताना विद्यापीठाकडून सर्व अधिविभाग/प्रशासकीय विभाग यांना अधिकृत दिलेल्या unishivaji.ac.in यावरूनच्या ई-मेल वरूनच सदरचा अर्ज भरता येईल. शिक्षक व प्रशासकीय अधिकारी यांना विद्यापीठाकडून अधिकृत unishivaji.ac.in या वेब वरून स्वतंत्र ई-मेल देण्यात आले आहेत त्यांनी त्याच ई-मेल वरून उपरोक्त नमुद गुगल लिंक ओपन करून त्यामध्ये माहिती सादर करावी. व अन्य सेवकांनी त्यांची माहिती विभागाच्या ई मेल वरून उपरोक्त नमुद गुगल लिंक ओपन करून त्यामध्ये माहिती सादर करावी.
3. अर्ज भरतेवेळी संबंधितांना आपले नांव, Employee Code याबाबत खात्री करावी तसेच गुंतवणूक केलेली रक्कम योग्य त्याच शिर्षकामध्ये नमुद करावी.
4. शिवाजी विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर यांची पतसंस्था याद्वारे घेण्यात आलेले कर्जाच्या रक्कमेपैकी फक्त व्याजाच्या रक्कमेचा तपशीलाची नोंद करावी तसेच पतसंस्थेने नमुद केलेली मुद्दलाची रक्कम (Principal Amt.) सदर अर्जामध्ये नमुद करू नये.
5. ऑनलाईन फॉर्म भरतेवेळी सोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून ती **Attach** करावीत.
6. अर्जामध्ये नमुद केलेली माहीती बरोबर आहे याची खात्री करूनच अर्जाच्या शेवटी दिलेल्या अटिच्या कॉलममध्ये क्लिक करून तद्नंतर **Submit** चे बटनाद्वारे अर्ज सादर करावा.
7. अर्ज सादर केलेनंतर त्याची कॉपी आपल्याकडे जतन करून ठेवावी.
8. सदरची माहिती दिनांक **25 एप्रिल 2022** पर्यंत भरण्यात यावी. तसेच तद्नंतर जे सेवक माहिती भरणार आहेत त्यांची माहिती पुढिल वेतनावेळी म्हणजेच माहे मे 2022 च्या वेतनावेळी विचार करण्यात येईल. यासाठी 20 मे 2022 पर्यंत मुदत राहील. तसेच विहित मुदतीनंतर ज्यांना सेव्हिंगची माहिती सादर करावयाची आहे त्यांना पुन्हा डिसेंबर 2022 मध्ये सदरच्या अर्जाची लिंक परिपत्रकाद्वारे कळविलेनंतर माहिती देता येईल.
9. ज्या सेवकांचे एल.आय.सी. चे हप्ते वेतनातून कपात होतात, ती रक्कम अर्जामध्ये नमुद करण्यात येवू नये.

उपरोक्तनुसार विद्यापीठातील सर्व शिक्षक/प्रशासकीय सेवक यांना कळविण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे आवश्यक माहिती विहित मुदतीत Online पध्दतीने सादर करावीत.

(स्वाक्षरी) 21/04/22
प्र. वित्त व लेखाधिकारी

शिवाजीविद्या./पगारपत्रके/डि.वाय/आयकर 2022-23/49
दिनांक- 21 एप्रिल 2022

सोबत : वरील प्रमाणे.

टिप : 1. सर्व अधिविभागप्रमुख तसेच सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव प्रशासकीय विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्वांच्या निदर्शनास आणावे.
2. वर्ग 04 च्या किंवा ज्यांना सदरचा अर्ज भरण्यासाठी अडचण येत असेल अशा सेवकांचे अर्ज संबंधित विभागामध्ये भरून घेण्याबाबत एकमेकांचे सहकार्य अपेक्षित आहे.

C:\Users\admin\Desktop\Dhairyasheel\IT REPORT MONTHLY\saving\2022-23\circular.docx